# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवायै समर्पिता

**दिनांक २८/०८/२०१९ रोजी (का.प.क्र.०२) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

शुक्रवार दिनांक २८/०८/२०१९ रोजी (का.प.क्र.०२ दि.२८/०६/२०१९ रोजीची तहकूब सभा) मा.सभापती श्रीमती.जयश्री सुरेंद्र कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलिक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी ११:४० वाजता वंदेमातरम् या गीताने सुरु झाली. सभेला मा.अति.आयुक्त श्री.डी.पी.कुलकर्णी, नगर सचिव,श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| अ.क्र. | उपस्थित स.सदस्यांची नांवे |
|---|---|
| ०१. | स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ०२. | स.स.श्री.राजु रामराव शिंदे |
| ०३. | स.स.श्रीमती खान सायराबानो अजमल |
| ०४. | स.स.श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखान |
| ०५. | स.स.श्रीमती शिल्पाराणी सागरअप्पा वाडकर |
| ०६. | स.स.श्री.अब्दुल नविद अब्दुल रशिद |
| ०७. | स.स.श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| ०८. | स.स.श्री.कमलाकर शामराव जगताप |
| ०९. | स.स.श्रीमती सिमा कहानुलाल चक्रनारायण |
| १०. | स.स.श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ |
| ११. | स.स.श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| १२. | स.स.श्री.नासेर तकिउद्दीन सिद्दीकी |
| १३. | स.स.श्रीमती सय्यद सरवत बेगम आरेफ हुसैनी |

श्री.राजु शिंदे : भाजपच्या माजी परराष्ट्रमंत्री श्रीमती सुषमा स्वराज यांना आणि माजी अर्थमंत्री अरूण जेटली यांचे दुःखद निधन झाले. सभागृहाच्या वतीने त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : आताच राजुभाऊ शिंदे यांनी सांगीतले कि मा.सुषमा स्वराज व अरूण जेटली यांच्या श्रध्दांजलीचा प्रस्ताव ठेवला आहे त्यास माझे अनुमोदन आहे. आणि मल्टीपर्पज हायस्कुलचे मुख्याध्यापक अफजल खान आणि आपल्या स्टॅन्डींग कमिटीचे जे मेंबर आहेत सदस्य सायराबानो अजमल खान यांच्या सासुचे काल निधन झाले यांना सुध्दा सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी आणि जागतिक बॅडमिंटन स्पर्धेत भारताला पहिले सुवर्ण पदक मिळवुन देणारी बॅडमिंटनपटु पी.व्ही सिंधू हिचे अभिनंदन करण्यात यावे. (यावेळी सभागृहाच्या वतीने सुषमा स्वराज व माजी अर्थमंत्री अरूण जेटली यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

मा.सभापती :स.राजु शिंदे व मा.स.शिल्पाताई वाडकर यांनी जो प्रस्ताव सभागृहात ठेवला त्यास अनुमती देऊन बॅडमिंटनपटु पी.व्ही सिंधू यांचे अभिनंदन करण्यांत येते.

श्री.राजु शिंदे : भारताचे मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांनी जम्मु कश्मीर बाबत निर्णय घेतला त्याबद्दल सभागृहात त्याचा अभिनंदनाचा ठराव मंजुर करण्यात यावा. स.सभापती मा.आयुक्त यांना आजच्या बजेटच्या या मिटींगचे कळविले असले तरी ते आज या मिटींग ला उपस्थित नाही.आज जे काही प्रश्न चर्चा होणार त्याची उत्तरे त्यांनी देणे आवश्यक आहे. आजच्या मिटींगची माहिती मा.आयुक्तांना कळवली असुनही मा.आयुक्त आजच्या मिटींगला आलेले नाही.असे कोणते कारण होते की मा.आयुक्त ऐवढी

महत्वाची बजेटची सभा असताना येवू शकलेले नाही याचा कारण सभागृहाला समजले पाहिजे. ही सभा जर कंटीन्यु करणार असाल तर येथे मिटींगमध्ये आम्ही जे काही प्रश्न विचारू त्याचे समाधानकारक उत्तर कोण आम्हाला देईल आणि त्याला कोण जबाबदार राहील याची सुदधा सभागृहाला माहीती दयावी.

अति.आयुक्त : मा.आयुक्त साहेब घनकचरा प्रकल्पास भेट देण्यासाठी गेलेले आहेत.

श्री.राजु शिंदे : सभा होती हे आयुक्तांना माहीत होते का? सभा असताना ते गेले तर त्यांनी सभापतीला विचारले का? सभापतीला विचारून जावे लागते. ते त्यांनी विचारले का? त्यांना जर दुसरीकडे जायचे होते तर त्यांनी सभापतीला कळवायला पाहिजे होते की आजची मिटींग उदया लावावी म्हणून किंवा परवा लावा म्हणून आम्ही थांबलो असतो. ते आपल्या स्टॅडींग कमिटीला ग्राहय धरता का? घनकचरा प्रकल्पाला भेट देण्यासाठी त्यांनी नंतर जायला पाहिजे होते

मा.सभापती : मा.आयुक्तांना आधी माहिती देऊनही परवानगी न घेता आजच्या मिटींगला गैरहजर राहीले. ते पुढच्या वेळी गैरहजर राहणार नाही याची दखल घेऊन कारण दयावे.(श्री.डी.पी.कुलकर्णी साहेबांना त्याची जबाबदारी देण्यात येते.)

श्री.राजु शिंदे : मला असे वाटते कि बजेटची मिटींग तहकुब करून खुप दिवसानंतर आपण ही मिटींग लावली होती. मा.आयुक्तांच्या अनुपस्थित केलेली चर्चा त्यांना मान्य असेल का?

अति.आयुक्त :स्थायी समितीने घेतलेले निर्णय मा.आयुक्त नियमाप्रमाणे अंमलबजावणी करतील.

श्री.राजु शिंदे : कलम ९५,१०४,१०३ नुसार आयुक्त हे मिटींगला जरूरी आहे. असेही वर्षभर मा.आयुक्त मिटींगला येत नाही. परंतु दोन मिटींगला त्यांना यावच लागत बजेटच्या सादर करण्यासाठी आणि अशा महत्वाच्या मिटींगला जर ते येवू शकत नसेल तर याच्यापेक्षा महत्वाचे इतर काम असु शकत नाही. या शहराच्या दृष्टीने ही अत्यंत महत्वाची मिटींग आहे. आपण जर इतके दिवस मिटींग तहकुब केली तर अजुन काही दिवस मिटींग तहकुब करू आणि शहरातील इतर ज्या काही अडचणी आहे समस्या आहेत त्यावर आपण बहुमताने इथे चर्चा करू.

श्रीमती.सरवत बेगम : कमिशनर साहेबांना केव्हाही फोन केला तर ते फोन उचलत नाही. कमिशनर साहेब ऑफिसमध्ये नाही आणि मिटींगला पण येत नाही. माझ्या वार्डात ड्रेनेजची ऐवढी समस्या आहे. ड्रेनेज लाईन ओहरफ्लो होऊन वाहते आहे. आयुक्तांनी पांडे साहेबांना पाठविले होते काम बघण्यासाठी त्याला दोन महिने झाले परंतु अजुनही हे काम पुर्ण झालेले नाही. आम्ही जेव्हा जेव्हा कामाच्या वेळी आयुक्तांना फोन करतो तेव्हा आयुक्त हे आमचा फोन घेत नाही. आणि मिटींगलाही उपस्थित राहत नाही.

श्री.राजु शिंदे : ही बजेटची मिटींग आहे आयुक्त नाही. तर मुख्य लेखाअधिकारी मिटींगला गैरहजर राहणे सभापतींचा अवमान आहे मुद्दाम आयुक्त व लेखाधिकारी हे मिटींगला अनुपस्थित राहण हे अत्यंत चुकीच आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :आताच डी.पी.कुलकर्णी साहेबांनी जो खुलासा या सभागृहामध्ये केलेला आहे त्याच्यानुसार त्यांनी सांगितले कि सभागृहामध्ये जे काही निर्णय घेतले जातात ते आयुक्तांवर बंधनकारक असतात परंतु जे काही निर्णय आतापर्यंत घेतले गेले नाही त्याचे किती बंधन त्यांनी पाळले आणि ऐवढेच जर कायद्याच्या चौकटीत राहुन जर महानगरपालिकेचे कामे जर चालत असतील तर त्याचा आम्हाला आनंद आहे. आपण या प्रशासनाचे प्रमुख म्हणून येथे उपस्थित आहोत. तर नेमके कारण काय की मुख्यलेखाधिकारी यांनी या सभेला उपस्थित राहू शकलेले नाही. त्यांनी आपल्याला कळवलेले आहे का सचिवांनी खुलासा करावा की कायद्यात काय तरतुद आहे.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : मा.सभापती मॅडम आयुक्त हे पहिल्यांदाच असे वागलेले नाही तर त्यांच हे असं वागण प्रत्येक वेळी आहे. त्यांना शिस्त लावण्याच काम तुम्ही केलं पाहिजे आणि आज जे

अधिकारी उपस्थित नाही त्यांच हे असं बेशिस्तीच वागण अत्यंत चुकीच आहे आणि त्यांच्या वर योग्य ती कारवाई झाली पाहिजे.

श्री.अब्दुल नावेद : मुख्य लेखाधिकारी व मा.आयुक्त हे आज या मिटींग ला उपस्थित नाही त्यावर कडक कारवाई करण्यात यावी. जो पर्यंत त्यांच्यावर कारवाई करत नाही तोपर्यंत त्यांना समजणार नाही. यांची कम्पलेन कमिशन साहेबांकडे करा किंवा ॲडिशनल कमिशनर साहेबांकडे करा.

मा.सभापती : आपली बजेटची मिटींग असताना मुख्य लेखाधिकारी हजर नाही. मी मा.आयुक्त साहेबांना सुचना देते कि त्यांनी मुख्यलेखाधिकारी यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी.

श्री.राजेंद्र जंजाळ : मी आज जेव्हा सभागृहामध्ये आलो मी याचा विचार करून आलो कि मला मुख्यलेखाधिकारी यांना काही विचारायच आहे मागे पुलवामा हत्याकांडामध्ये आपले जे काही भारतीय जवान शहीद झाले होते. त्यांना आपण सगळया नगरसेवकांनी एक महिण्याचे मानधन देऊ केल होत त्याच्यानंतर अधिकाऱ्यानी त्यांचा काही दिवसाचा पगार त्यांना देऊ केला होता तो अजुनपर्यंत का पोहोचला नाही. त्यानंतर सांगली आणि कोल्हापुर मध्ये पुरग्रस्तांना मदत म्हणून प्रत्येक नगरसेवकांनी काही मानधन देऊ केले होते. ते अजुन का पोहोचला नाही. या प्रश्नाचे उत्तर कोण देणार आहे. मा.आयुक्त म्हणुन येथे अति.आयुक्त डी.पी.कुलकर्णी सर येथे बसलेले आहे. तुम्ही सक्षम आहात का? मा.आयुक्तांना येथे बोलवण्यात सक्षम आहात का जर तुम्ही त्यांना बालवण्यात सक्षम असाल तर ही मिटींग आपण पुढे चालू ठेवू नसता ही मिटींग आपण आता स्थगित करू असे माझे स्पष्ट मत आहे. शहराचा विकास झाला पाहिजे यासाठी आम्ही या सभागृहात येतो. त्यामुळे आम्ही येथे पोट तिडकिने विषय मांडतो. याचे उत्तर देणारे जर येथे हजर नाही तर अशा प्रकारे हे सभागृह चालणार नाही. आता तरी यावर कठोर निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. मी सचिवांना वारंवार सुचना करतो कि आपण यावर काही कारवाई करू शकतो का?

अति.आयुक्त : आता लेखाधिकारी व आयुक्तांना येथे बोलावण्याची गरज नाही. त्यांना माहीत होते कि आज मिटींग आहे म्हणून तरीही ते का आले नाही याचा खुलासा घेतला जाईल.

श्री.राजेंद्र जंजाळ : एका मिटींगला नसते आले तर खुलासा घ्यायचा दुस-या मिटींगला आले नसते तर पत्र पाठवायचे तीन मिटींगला आले नसते तर त्यांना फोन करून प्रत्यक्ष विचारायचे आणि जर ते प्रत्येक वेळी येत नसतील तर प्रत्येक वेळी खुलासा घ्यायला ऐवढा वेळ आम्हाला नाही हे मा.अति.आयुक्त डी.पी.कुलकर्णी सर आमच्याकडे कारण या शहरामध्ये ऐवढे प्रश्न आहे कि त्या प्रश्नाना तोंड आम्हाला दयावे लागते.

श्री.राजु शिंदे :८ ते १५ दिवसांत केव्हाही आचारसंहिता लागू होईल आणि या १५ दिवसांमध्ये जर आमचे कामे होत नसतील ते तसेच ठेवायचे असतील तर आम्हाला तसे सांगा मिटींग घेण्याची वेळच येऊ देऊ नका. कलम ९५ नुसार आयुक्तांनी या मिटींगला येणे गरजेच आहे. अति.आयुक्त, उप.आयुक्त हे मिटींगला चालणार नाही. जर बजेट आयुक्तांनी सादर केलं आहे तर त्या प्रश्नांच उत्तर देखील आयुक्तांना दयावं लागेल. जर मुख्य लेखाअधिकारी जर या सभेला हजर राहू शकत नसतील तर त्यांनी तस सभापती मॅडमला कळवायला हवे होते. हा आपला आणि आपल्या सभागृहाचा अपमाण आहे. मला असे वाटते ताबडतोब मुख्य लेखाअधिका-यांवर कारवाई करावी त्यांना महानगरपालिकेतुन कार्यमुक्त करावे. आणि दुस-या कोणाकडे तरी त्याचा चार्ज देण्यात यावा. मा.आयुक्त जो पर्यंत मिटींगला येत नाही तो पर्यंत हा विषय बाजुला ठेवावा आयुक्त येतील ते आपल्या प्रश्नांचे उत्तर समाधानकारक देतील त्यानंतर हा बजेटचा विषय आपण मार्गी लावू आणि आयुक्तांना आपण सुचना करावी कि अत्यंत महत्वाची मिटींग आहे तुम्ही दोन ते तीन

दिवसांत थोडया वेळानी मा.आयुक्तांना बोलून घ्यावे व आयुक्त उपस्थित राहतील त्या दिवशी ही मिटींग आपण आयोजित करावी शहरातील इतर काही समस्या किंवा त्यावर आपण सर्व सदस्यांनी चर्चा करावी आणि ताबडतोब संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची सुचना दयावी आणि बजेटच्या मिटींगला मुख्यलेखाधिकारी यांचे येणे बंधणकारक असते आणि अशा मिटींगकडे जर ते दुर्लक्ष करीत असतील तर येत नसतील तर योग्य ती कारवाई झालीच पाहिजे. बजेटच्या मिटींगवर चर्चा बंद करून आपण आता आपल्या महत्वाच्या प्रश्नांवर चर्चा करू आणि ती चर्चा झाल्यावर आपण मीटींग तहकुब करू.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : कालच मी मुख्यलेखाधिका-यांना पत्र दिले होते कि काल जे बिलं दिले त्याची सर्व माहीती मला उदया सभेत पाहिजे. हे मी त्यांना एक दिवस अगोदर सांगितले होते तुम्हालाही मी हे पत्र दिले होते तरीही ते आज बेशिस्तपणे वागलेले आहेत. त्यांच्यावर योग्य ती कारवाई केली पाहिजे.

श्री.राजेंद्र जंजाळ :अधिकारी प्रत्येक वेळी गैरहजर राहत असेल आणि सदस्यांच्या प्रश्नांपासुन दुर पळण्याचा प्रयत्न जर ते करीत असतील तर १०० टक्के ते कुठे तरी चुकीचे वागत आहे. ते प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी सक्षम नाही. त्यांच्यावर महानगरपालिका अधिनियम ५६ मध्ये जे कलम आहे त्यात त्यांचे किमान एक महिण्याचे वेतन या ठिकाणी थांबवावे.

मा.सभापती : मुख्यलेखाअधिकारी या महत्वाच्या मिटींगला जाणून बुजून गैरहजर राहिल्यामुळे त्यांच्यावर प्रशासनाने कडक कारवाई करावी किंवा निलंबनाची कारवाई करावी. त्याचबरोबर त्यांचे एक महिण्याचे वेतन कपात करण्यात यावे.

श्री.राजेंद्र जंजाळ : शहरामध्ये १०० कोटीच्या रस्त्याचे काम हाती घेण्यात आले. अनेक ठिकाणी वर्तमानपत्रातही बातम्या आल्या आहे. माझ्या वार्डातील २-३ रस्त्याचे काम चालू आहे त्या कामाच्या बाबतीतही अधिकाऱ्यांना फोन केले. अधिकारी त्या ठिकाणी येऊन गेले. मा.आयुक्तांना सुध्दा ही बाब निदर्शनास आणुन दिली परंतु अजुनही ते काम चालु झालेले नाही. माझ्या वार्डातील नागरिकांचे मला फोन आले की शेवटी मला त्या अधिकाऱ्यांना रात्री १०:३० वाजता त्या ठिकाणी बोलवावे लागले. सहा फुट जे खोल खड्डे केले त्यात उतरून दाखवावे लागले कि या ठिकाणी कशा पध्दतीने त्रास होतोय. त्यानंतर या ठिकाणच्या रस्त्याचे काम चालू झाले. आठ दिवस तो रस्ता मुरुक टाकुन करून भरला परंतु पुन्हा आठ दिवसापासुन त्या रस्त्याचे काम बंद आहे. त्यानंतर जानकी रेस्टॉरंट पासुन क्रिडासंकुलना समोरचा जो रोड आहे तो रोड सुध्दा पंधरा दिवसांपासुन बंद आहे. माझे म्हणणे असे की महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती खराब असल्यामुळे बजेटची जी कामे आहे. जे कॉन्ट्रॅक्टर करत नाही त्या वेळी कॉन्ट्रॅक्टरला म्हणावे लागते की काम करा आम्ही तुम्हाला पेमेंट द्यायला लावतो. परंतु जे बजेटचे काम आहे ज्याचे बजेट उपलब्ध आहे त्याचे पैसे मिळणार आहे परंतु शासणाने बजेट उपलब्ध करून दिले आहे ते असताना सुध्दा आपले अधिकारी त्या कॉन्ट्रॅक्टर कडून काम का करून घेऊ शकत नाही. म्हणजे एखादा जर कॉन्ट्रॅक्टर काम करत नसेल तर अधिकाऱ्याने त्या कॉन्ट्रॅक्टर वर लगेचच कारवाई केली पाहिजे आज या सगळया कामाचा टेंडर काढून अनेक महिने लोटले त्या रस्त्याचे काम व्यवस्थितपणे चालू झालेले नाही हे या शहरामध्ये आता गणेशउत्सव आहे सगळे सण चालु होत आहेत. नागरिकांना याचा त्रास होत आहे. रस्त्याची कामे अर्ध्या-अर्ध्या ठिकाणी अडवून ठेवलेले आहेत कामासाठी त्यामूळे ट्राफिक जाम होत आहे. एखादा अपघात झाला आणि जर एखादा जीव गमवावा लागला. तर त्या अधिकाऱ्यांवर व कॉन्ट्रॅक्टर वर गुन्हा दाखल झाला पाहिजे मग याची जबाबदारी नेमके कोण घेणार आहे. आणि या शहरामध्ये एक वेगळ्या प्रकारचे ट्रेन्ड तयार झाला आहे. जेव्हा अशा पध्दतीने कामे होत नाही नागरिकांना त्याचा त्रास होतो त्यावेळी जबाबदार

लोकप्रतिनिधी आणि नगरसेवकांनाच ठरवले जाते. साईट वर काय काम चालु आहे हे संबंधित जे अधिकाऱ्यांना, पदाधिकारी आहेत त्यांना सांगणे अपेक्षीत असते तर आम्ही त्या रस्त्यावर जातो. रस्त्यावर बघतो इथे खड्डे आहे का इथे काम चालु आहे का आम्ही त्या कॉन्ट्रॅक्टर ला अधिकाऱ्याला फोन करतो कि अजुन काम चालु झालेले नाही. १ वेळेस २ वेळेस नाही आज माझ्या मोबाईलवर कमीत कती ५० फोन केलेले आहे. अरे ५० फोन करून सुद्धा जर काम चालु होत नसेल ५० वेळा फोन करून तो अधिकरी कॉन्ट्रॅक्टर वर कारवाई करत नसेल तर नेमक त्याचे कारण काय या सभागृहामध्ये याचा खुलासा झाला पाहिजे.

मा.सभापती : संबधित अधिकाऱ्याने याचा खुलासा करावा.

श्री.राजु शिंदे : जो प्रश्न केला कि १०० कोटी चे जे रस्त्याचे काम आपल्याकडे संथगतीने चालू आहे ते पुर्णपणे झालेले नाही हे. कालच मा.मुख्यमंत्री साहेबांनी कालच्या सभेमध्ये घोषणा केली कि आगोदर दिलेल्या १०० कोटीतले जर ७५ टक्के तुम्ही खर्च केले तर मी तुम्हाला अजुन २०० कोटी रस्त्यासाठी देईल शासन पैसे देण्यास तयार आहे. मनपा खर्च करीत नाही अशी वेळ आली. १२५ कोटी देण्याचे कबुल केले त्यानंतर ६ महिने ती यादी तयार झाली नाही १ वर्षापुर्वी उद्‌घाटन केले अजुन ते रस्ते कम्पलीट झालेले नाही बजेटचे कामे आहेत त्यांच्या हिशोबाने त्यांनी काम घेतलेले आहे आता त्या वेळचा रेट आणि अत्ताचा रेट विचारात घेतला तर त्यांना त्यामध्ये चांगली कमाई आहे परंतु ते करायला का तयार नाही. का करू दिले जात नाही किंवा अधिकारी लोकांचे त्यामध्ये काही अडखती आहेत का किंवा अधिकारी कोणाच्या दबावाखाली काम करता आहेत का काम का बरं होत नाही. मला असं वाटत एकवेळेस सर्व कॉन्ट्रॅक्टरची मिटींग दालनात बोलवावी सर्व कॉन्ट्रॅक्टरला विचारावे, काय अडचणी आहे त्यांची बी एम सी ची अडचण आहे की आपल्या अधिकाऱ्यांची अडचण आहे की आणखी दुसऱ्या कोणाची अडचण आहे काम का होत नाही. आणि जर काम होत नसेल तर मला असं वाटत आपल्याकडे काही तरतुद असेल की त्यांना वेळेच्या आत काम होत नसेल तर त्या कामावर पेनल्टी लावली पाहिजे दंड आकारला पाहिजे काही ठिकाणी जे-जे रस्ते खोदून ठेवलेले आहेत एका साईडची ट्राफिक बंद करून ठेवली आहे आणि ते काम तसेच पडलेले आहे. काही ठिकाणी रस्ते अर्धवट करून ठेवलेले आहेत. ते कम्पलीट करण्यामध्ये अडचण काय आहे त्यांची नेमकी. आणि आपण जर असेच काम जर चालू ठेवलं तर अशाप्रकारे आपल्या कडून १०० कोटी खर्च होणार नाही पुढे आपल्याला १२५ कोटी मिळणान नाही. आणि कडे २०० कोटी देऊ केले ते आपल्याला मिळणार नाही. मुद्दामहून अधिकारी लोक या शहराच्या विकासासाठी प्रयत्न का करीत नाही. या अधिकाऱ्यांचीच मानसिकता नाही का आपल्या शहरातले काम होऊ नये म्हणून कोण यांच्यामध्ये अडथळा करतयं याची सुध्दा माहिती आपल्याला या सभागृहामध्ये झाली पाहिजे. मला असे वाटते याच उत्तर मा. आयुक्त साहेबांनी दिले पाहिजे त्याचे कारण काय आणि जर होत नसेल आणि ते ज्या क्वालीटीचे होते ती क्वालीटी बरोबर आहे कि नाही. विकास काम करताना मटेरीयल कोणते किती वापरायचे याचे मोजमाप दिलेले असेल. आज रस्ते करू नंतर ३ महिण्याने ते रस्ते खराब होतील याची काळजी कोण घेणार आहे. बऱ्याचश्या ठेकेदारांनी काम घेतलं त्यांनी दुसऱ्याला काम दिलेलं आहे. आणि ते सबमिट केल्यामुळे त्याची गुणवत्ता कोण तपासणार आहे. मला असे वाटते कि कामे एकास द्यावे असे फायनल केले होते चार-चार पाच-पाच काम वाटुन दिले त्याच्यामुळे ही अडचण चालु आहे आणि क्वालीटीमध्ये मला असे वाटते की कुठेच काही मेळ बसत नाही. ज्या पध्दतीने आपल्याला क्वालीटी पाहिजे ती मिळत नाही आता माझ्या वार्डामध्ये सुध्दा मागे एका रस्त्याचे काम आता ९० टक्के पुर्ण झाले. पण मला त्या रस्त्यावरून चालताना असे वाटते की घोडयावर बसुन चाललो कि काय कुठेही त्याच्यामध्ये सरळता नाही. आता जर एक्सप्रेस हायवेवर गेलो तर लक्षात येते कि रस्ता कसा झालेला आहे. आणि आपण एक किलोमीटरवर गेलो कि लगेच कळतं हा रस्ता कसा झालेला आहे.

जसा रेल्वे स्टेशनचा रस्ता असेल किंवा आगोदर झालेला गजानन महाराज मंदीर जवळचा रस्ता असेल आगोदर झालेला तसा रस्ता असेल तर मला असं वाटत अत्यंत निकृष्ठ दर्जाच काम होत आहे. कोणी त्याच्यावर पीएमसी सुध्दा त्याच्यावर मॅनेज आहे कि काय हे माहिती नाही. ते सुध्दा त्यांच्याकडे लक्ष दयायला तयार नाही. आणि त्या रस्त्याची देखभाल ज्या विभागाकडे असेल त्या अधिकाऱ्याला हे सुध्दा माहित नसेल एखादया गुणवत्तेत ओके असेल त्याच बिल देण्याचा सुध्दा त्या अधिकार आहे. बील कुठे पाठविण्याचे त्याच्यामुळे सुध्दा काही काम होते कि नाही हे पण मला वाटते तपासल्या गेले पाहिजे आणि ते तपासणारी यंत्रणा आपली कोणती आहे का मोबदला घेऊन तपासणारी आहे का खरंच मोजमाप लावुन तपासणारी आहे त्याचे जे काही फोर्ट कट घेतो ते फोर्ट कट तपासतो का त्या फोर्ट कटच सॅम्पल घेतल का आपल्याकडे काही जमा ठेवलेत का त्याच्यावर नियंत्रण कोण करतय याचा खुलासा आपल्या या मिर्टींग मध्ये झाला पाहिजे.

श्री सचिन खैरे : १०० कोटीचे रस्त्याचे काम चालू आहे त्यात त्यांनी सात आठच रस्त्यांचे काम चालू केले आहे. बाकीचे रस्ते का चालू करत नाही आणि त्या रस्त्यांची व्यवस्थितपणे देखभाल होते नाही. काही रस्ते चालू केले अर्धवट सोडले आता खडकेश्वरचा रस्ता पुर्ण करण्यात आलेला नाही. पूर्वीच्या निधीतून काम केले तरच शासन पूढील निधी देणार आहे.

मा.सभापती : अधिकाऱ्याने खुलासा करावा.

कक्ष प्रमुख (दक्षता) : राज्य शासनाकडून १०० कोटीचे अनुदान मिळालेले आहे यामध्ये आपले चार पॅकेजेसचे कामाची आपण निविदा काढलेली आहे. निविदा काढून डिसेंबर/जानेवारी त्यांना वर्क ऑर्डर दिलेली आहे. वर्क ऑर्डर दिल्यानंतर जीएसटी च्या जवळपास दीड ते दोन महिने हे प्रकरण जवळपास रेंगाळत राहील.

श्री.राजेंद्र जंजाळ : आता सध्याच्या परिस्थितीत रस्त्याची कामे का थांबवली आहे. आणि त्याची गुणवत्ता जर चांगली नसेल तर काय कारवाई केलेली आहे आणि जर या ठेकेदारावर कारवाई केलेली नसेल तर आपल्यावर दबाव कोणाचा आहे.

श्री.राजु शिंदे : ज्या चार एजन्सीने काम हाती घेतलेले आहे. त्यांनी चार काम अॅटटाईम चालु करायला हवे होते तो तेवढा सक्षम होता म्हणून ते काम त्यांना दिल्या गेले नाही तर आपण वाढवून टेंडर काढले असते समजा एखादया एजन्सीने जर २५ कोटीचे काम घेतले आणि त्याला १० रोडचे काम घेतले तर त्याने अॅटटाईम पाच,सहा रोडच काम चालु करून टाकायला हवे होते असे जर एका एका वार्डाच काम करत बसले तर वर्ष निघुन जाईल. आपली अपेक्षा अशी होती कि त्यांनी एक एक काम करावे असे टेंडर मध्ये होते का? कामे का सुरु करत नाही.

कक्ष प्रमुख (दक्षता) : ही जी चार पॅचवर्कची कामे निघालेली आहे त्याचे माईल स्टोन ठरवुन दिलेले आहे. दिलेल्या कामाचे २५ टक्के काम या पिरेडमध्ये होणार, उरलेले ५० टक्के नंतर कॉन्ट्रॅक्टरने या कामाचे डिलींग केलेले आहे. डिलिंग केल्यांनर त्यांनी ते माईल स्टोन पुर्ण केले नसल्यास महानगरपालिकेचे नुकसान होत आहे. त्यासंबंधी नोटीस बजावली आहे. आणि जे बॅलन्स वर्क आहे त्याचा १/२००० नुसार जवळपास चाळीस ते पन्नास हजार प्रमाणे फाईनची नोटीस दिलेली आहे. त्यांना ताकित दिलेली आहे की सप्टेंबर अखेर पर्यंत त्यांनी किमान ७५ टक्के काम पुर्ण करावे नाही तर ते काम त्यांच्याकडून काढून घेण्यात येईल. याची सुध्दा नोटिस दिलेली आहे. नोटिस देऊन त्यांना पंधरा दिवस झाले.फायनल नोटिस त्यांना दोन दिवसाअगोदर दिली आहे.

श्री.राजु शिंदे : त्यांनी आतापर्यंत ७५ टक्के काम पुर्ण करायला पाहिजे होते. २५ टक्के जर काम बाकी असेल तर त्या दिवसापासुन फाईन करण्यात यावे. एक पत्र काढण्यात यावे की, तुम्ही जर काम पुर्ण नाही केले तर तुम्हाला पुढच्या टेंडरला सुध्दा भाग घेऊ देणार नाही.

कक्ष प्रमुख (दक्षता) : आरएमसी प्लान्ट हा प्रीप्लान्ड असतो.

श्री.राजु शिंदे : माझ्या माहितीप्रमाणे आरएमसी हे दुसऱ्या आरएमसीकडून आणतात आणि त्या आरएमसी रेती कोणत्या क्वालिटीची आहे. याचा विचार न करता पुर्णपणे विश्वास टाकतो ते बघितला जातो काय जेव्हा आपण सॅन्ड क्रेन मध्ये टाकतो तेव्हा सॅन्ड क्रेन धुतलेली पाहिजे ते फक्त कच्ची माती टाकत आहे. त्यामध्ये सिंमेट प्रमाणात नसते. सिंमेट ३५ वेळा जरी टाकले तरी हिरवगार दिसते.

कक्ष प्रमुख (दक्षता) : हिरवगार जरी दिसत असेल तरी फायनल टेस्टींग असते त्यांनी केलेल्या कामाचा कोड बाहेर काढून कोडची टेस्टींग करतो.

श्री.राजु शिंदे : प्रत्येक रोडची टेस्टींग करतो पण प्रत्येक गाडीची नाही होत

कक्ष प्रमुख (दक्षता) : आपण रँडम टेस्टींग घेतो .

श्री.राजु शिंदे : मी काम चालू होण्या अगोदर पत्र देखील दिले. कि आपण ज्या एजन्सी सोबत करार केला आरएमसी घेतो त्यालासुद्धा यामध्ये जबाबदार धरले पाहिजे.

कक्ष प्रमुख (दक्षता) : त्याचा एमओयू सुद्धा केला आहे. आरएमसी मालक व ठेकेदार ज्याच्यांशी आरएमसी करार केला आहे त्यांचा एमओयू घेतल्याशिवाय आम्ही परवानगी देत नाही

श्री.राजु शिंदे : आतापर्यंत सिंमेटच्या तपासणी संदर्भात किती व्हिजीट केल्या आहे. २०० जीबी रेती आहे किंवा रॉयल्टी चेक केली आहे का?

कक्ष प्रमुख (दक्षता) : रॉयल्टी कपात करु शकतो.

श्री.राजु शिंदे : १० क्यूबच रेती त्यांच्याकडे आहे आणि पूर्णपणे त्याच्यामध्ये क्रॅस वापरली जाते आणि त्यामुळे या शहरामध्ये धुळीचे साम्राज्य निर्माण होणार आहे. २ महिन्यानंतर या रस्त्यावर गेल्यानंतर पूर्ण धूळ उडणार आहे. कारण जिथे जिथे गल्लीबोळयामध्ये हे वापरले आहे . महानगरपालिकेच्या बजेट मधून जे १०० कोटीची आपण कामे केली आहे तिकडची परिस्थिती काय आहे रस्त्याची ते बघून इतर ही कामे करावीत.

कक्ष प्रमुख (दक्षता) : आरएमसी वर दोन डेप्युटी इंजिनिअर नेमले आहे ते प्रत्येक आरएमसी ला जाऊन भेट देतात. प्रत्येक गाडी चेक करतात.

श्री.राजु शिंदे : जर आरएमसी ला जाऊन चेक केले नाही आणि रेतीचे प्रमाण पाहिले नाही १०० टक्के जर बोगस मटेरियल वापरत असेल तर १०० टक्के गॅरंटीने सांगतो २-३ महिन्यानंतर या शहरामध्ये फुफाटा होणार आहे १०० कोटीचा.

कक्ष प्रमुख (दक्षता) : आरएमसीचा माल जागेवर आल्यानंतर मटेरियल वॉश करुन चेक करतो कि त्यात नॅचरल सॅन्ड किती आणि मिनरल सॅन्ड किती आहे आणि फायबर आहे कि नाही या सगळया तपासण्या करुन आम्ही पूर्ण प्रिकॉशन घेतो.

श्री.राजु शिंदे : किती ही टेक्नीकल बोललो तरी ३ महिन्यानंतर याचा रिजल्ट येणार आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ : काझी साहेबांनी जो शब्द वापरला नॅचरल सॅन्ड म्हणजे वाळू. आपल्या जिल्हयामध्ये एकही वाळूचे टेंडर चालू नाही. कोणत्याही तहसिलदाराला चौकशी करु शकतो. जेव्हा एकही टेंडर चालू नाही तर रेती कोठून आणत आहे ते चेक करावे. टेंडरमध्ये दिले ९० टक्के चांगले असावे याचा अर्थ आपल्या लोकल कॉन्ट्रॅक्टर काम भेटणार नाही आणि बाहेरच्या कॉन्ट्रॅक्टरला काम भेटेल यासाठी त्या अटी टाकण्यात आल्या होत्या त्या पूर्ण झाल्या का १ विद आउट फेबर न वापरता त्यांनी कामे केले आहे. संध्याकाळ पर्यंत त्याच लोकल वायब्रेटर काम पूर्ण झाले आहे ते काम समाधानकारक असे वाटते का?

श्री.राजु शिंदे : अशी परिस्थिती निर्माण करता कि काही पण करा पण काम पूर्ण करा.

श्री.राजेंद्र जंजाळ : तुम्ही स्वतः या कामाशी समाधानी नाही. तुम्ही जे टेक्नीकल स्पेसिफिकेशन दिले ते फक्त दयायच म्हणून दिले तूम्ही स्वतः समाधानी नाही. काम चांगल्या क्वालिटीचे व्हावे हे अपेक्षित आहे.

कक्ष प्रमुख (दक्षता) : एवढी शाश्वती देतो कि काम पूर्ण दर्जात्मक करुन घेण्याचा प्रयत्न आहे आणि ते करुन घेणार.

श्री.राजेंद्र जंजाळ : शिवाजीनगरच्या रोडच्या बाबतीत दोनदा व्हिजिट करुन गेले त्यानंतर १०० कोटीच्या रोडच्या पहिले आदर्शरोड घेतला त्यांनी त्या रोडवर वरती येण्यासाठी रॅपच बनविला नाही गोल्डन केअर हॉस्पिटलचा चा ५०० चा जो रोड आहे त्यावर जर उतार तयार केला नाही तर त्यावर लोक जाणार कसे?

कक्ष प्रमुख (दक्षता) : जे १०० कोटीचे रोड आहे त्यांना जोडणारे रस्ते आहे त्यांना स्लोप करुन देण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे आणि पाण्याचा निचरा कसा होणार ते आम्ही बघणार आहोत.

श्री.राजेंद्र जंजाळ : छोटया आणि मोठया रस्त्यांचा इनडेक्स चेक केलेलाच नाही. १०० कोटीच्या रस्त्याच्या बाबतीत शहरांच्या नागरिकांचा भावना प्रचंड संतप्त आहेत. माझ्या वार्डातील जाणारा रोड हा बीड बायपास कडे जाणारा आहे. दररोज शहरातील किमान ५०००० लोक त्या रस्त्याने येतात. बीड बायपास रोडवर मोठे कॉलेज आणि हॉस्पिटल्स आहेत. माननीय मुख्यमंत्री काल त्या रस्त्यावरुन गेले त्या रस्त्याचे काम लवकरात लवकर चांगले झाले पाहिजे.

कक्ष प्रमुख (दक्षता) : डिसेंबर अखेर पर्यंत ७५ टक्के दर्जात्मक काम पुर्ण करुन देऊ.

श्री.सचिन खैरे : मकई गेट ते बिबी का मकबरा पर्यंत जे काम चालू आहे त्यात इएसआय ची काही अडचण आहे का?

कक्ष प्रमुख (दक्षता) : इएसआय ची काही अडचण नाही पण त्याच्या एका बाजूला नाला आलेला आहे त्यामुळे रीडींग इनव्हाल करायची आहे ती बाब अंदाजपत्रकात आलेली नाही ती संख्याकडून करुन घ्यायची आहे आणि सप्टेंबर अखेर पर्यत तो रस्ता पूर्ण होऊन जाईल बीबी का मकबराच्या समोरचा पॅसेज निविदेमध्ये नाही पण कॉन्टीटी सेव्ह झाली तर तो पोर्शन कव्हर करु. परंतु त्या ठिकाणी लेव्हलचा प्रॉब्लेम आहे कारण तो रस्ता झाला तर मकबरॆं उंची कमी येण्याची शक्यता आहे.

श्री.सचिन खैरे : १०० कोटीच्या किती रस्त्याचे काम चालू आहे.

कक्ष प्रमुख (दक्षता) : एकूण ३० रस्ते आहेत त्यापैकी २१ रस्त्यांचे काम चालू आहे आणि ९ रस्त्यांचे काम हाती घेणे बाकी आहे सप्टेंबर अखेर या रस्त्यांचे काम पूर्ण झाल्यावर उर्वरित रस्ते हाती घेऊ आणि बहुतांश रस्ते सप्टेंबर मध्ये सुरु होतील.

मा.सभापती : स. सदस्यांनी ज्या सूचना केल्या त्याचे उत्तर देण्यासाठी अधिकारी सभेला उपस्थित नसतात हे योग्य नाही प्रशासनाने तशा सूचना दयाव्यात. मिंटीग असताना अधिकारी हजर राहत नाही ही गोष्ट अतिशय दुःखद म्हणावी लागेल आम्हा स्वतःला अधिकाऱ्यांना आणावं लागत याहुन दुसरी दुःखद गोष्ट नाही सदस्यांनी ज्या सूचना केल्या त्याचा संबधीत अधिकाऱ्यांनी त्याचा खुलासा करावा.

श्री.राजु शिंदे : काम करुन घेण्यास आपण सर्व सक्षम आहे याच्यांकडून काम करुन घेण्यात यावे. सदस्य काम करीत नाही असा मॅसेज जनतेसमोर जाऊ नये.

मा.सभापती : माझी इच्छा होती कि सगळयांचा सहभाग असणे आवश्यक असते सदस्यांनी साथ दिली पण प्रशासन साथ देत नाही याचा खेद आहे.

श्री.राजू शिंदे : प्रशासनाच्या सुद्धा आक्षेप करु त्यांच्याकडून काम कसे करुन घ्यायचे त्याबाबत आदेश करावे.

मा.सभापती : त्यांनी मिटींगला हजेरी जरी लावली तरी आम्हाला त्यांचे खुप सहकार्य मिळेल.

श्री.राजु शिंदे : त्यांनी असं समजू नये कि महिला सभापती आहे आणि ते काही करणार नाही आणि त्यांच्याकडून काही होणार नाही त्या खूप सक्षम महिला सभापती आहेत आणि सभापतीनी आता आदेश दिले आहे की संबंधित अधिकारी गैरहजर असलेले त्याच्यावर कारवाई करा आणि त्यांचे एक – एक महिन्याचे वेतन सुध्दा कपात करा आणि मला असे वाटते की इतिहासातील पहिली घटना आहे की अधिकाऱ्याची एक -एक महिन्याचा वेतन कट करायचा निर्णय घेतला आपण सक्षम आहोत पण आपण जी भावना व्यक्त करतो पण आपल्या सहकारी कर्मचाऱ्यानी साथ दिली पाहिजे जर अधिकारी दूर्लक्ष करत असतील

तर त्याच्यांकडून काम कसे करुन घ्यायचा ते आपल्याला जमते आणि एवढया लोकांनी आपल्याला निवडून दिले सर्वांना सोबत घेऊन जे काही प्रयत्न करतो आणि ते प्रयत्न करतो . ते प्रयत्न कमी पडताय ही आमची कमजोरी समजू नाही हेच आम्हाला माननीय सभापतीला सांगायचे होते.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : आपण पहिली महिला सभापती आहे म्हणूनच इतिहास घडवला आहे पण या अधिकाऱ्यांना सुध्दा शिस्त लावण्याचा इतिहास तुमच्या कार्यकाळात घडणार आहे.

श्री.कमलाकर जगताप : अतिक्रमणाचा विषय आहे आपण जो १०० फुटी रोड बनविला आहे तो सोहम मोटर्स पासून ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळया पर्यंत आहेत त्याचे काम चालू आहे पण सोहम मोटर्स पासून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयापर्यंत अतिक्रमण करुन २ वर्षे झाली. कार्यवाही होत नाही.

वार्ड.अभियंता(श्री.कांबळे): आत्ताच सदस्यांनी सांगितल अतिक्रमणाबददल मिटींग झाल्यानंतर मी स्वतः जाऊन पाहणी करेल.

श्री.कमलाकर जगताप : सोहम मोटर्स ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळयापर्यंत जे अतिक्रमण केले आहे ते लिगल आहे आणि ते सर्व्हिस रोडसाठी काढून दयायला ते तयार आहे २ वर्षापासून ती फाईल कूठे आहे शोध घ्यावा.

वार्ड.अभियंता(श्री.कांबळे): फाईल शोधून देतो.

श्री.कमलाकर जगताप : कोणत्या टेबल वर आहे मी सांगतो तुम्हाला चोपडे साहेबांना विचारा पाठीमागेच असतील ते तिचा नंबर व डेट सांगतो निकम साहेबांकडून कोणत्या तारखेला आलेली आहे ते पण सांगतो जिथे सर्व्हिस बोर्ड ची आवश्यकता आहे जिथे ॲक्सिडंट होतात रोज त्यांना मला तोंड दयावे लागते. काम तातडीने करावे.

वार्ड.अभियंता(श्री.कांबळे): संचिका नगररचनेकडून माहिती प्राप्त करुन त्याविरुद्ध कार्यवाही करतो.

श्री.कमलाकर जगताप : फाइल निघून २ वर्ष झाली आमचा कार्यकाळ ८ महिन्याचा झाला आणखी किती दिवस लागतील. रोड बनवून तयार झाला आहे. तुम्ही अतिक्रमण काढायला तयार नाही

वार्ड.अभियंता(श्री.कांबळे): आज पहिल्यांदा हा विषय माझ्यासमोर आला आहे.

मा.सभापती : एकाही अधिकाऱ्याकडून समाधानकारक खुलासा नाही आहे. आणि आज मिटींगला बरेच अधिकारी गैरहजर आहे त्यामुळे ही मिटींग इथेच स्थगित करते.

श्री.सचिन खैरे : अतिक्रमणाचा विषय आहे बेगमपुरा आणि पहाडसिंगपुरा येथील जेवढे नाले आहेत तेथे अतिक्रमण झालेले आहेत ते अतिक्रमण काढण्यात यावे पूढे जाऊन ते वाढत जाईल जर आताच त्यांना कंट्रोलमध्ये नाही आणलं तर ते तात्काळ काढण्यात यावा. मकईगेट ते बीबी का मकबरा रोड तो पण क्लिअर करण्यात यावा तिथे पण बऱ्याच जणांनी शेड टाकले आहेत आणि काम चालू आहेत. ते अतिक्रमण तात्काळ काढण्यात यावे.

श्रीमती.सुरेखा सानप : माझा विषय अतिक्रमणचाच आहे. मागच्या मिटिंगमध्ये सांगितले होते की, वार्डात बुद्धविहारच्या पाठीमागे चालू असलेले अतिक्रमण रोकतो पण अजुनही ते बांधकाम चालू आहे आणि राजेंद्रनगर येथे भरपूर प्रमाणात बांधकाम झालेले आहेत पण ते लिगल आहे कि इलिगल आहे किंवा कोणाच्या परमिशनने झालेले आहेत याबद्दल कोणालाच माहिती नाही विचारल्यास उडवा उडवीची उत्तर देतात.

श्री.राजू शिंदे : ताबडतोब जाऊन बुद्धविहार पाठीमागील अतिक्रमण थांबवावे.

श्री.सचिन खैरे : लोकांना प्रशासनाचा धाक राहिलेला नाही

मा.सभापती : संबंधित अधिकाऱ्यांनी याचा खुलासा करावा

उपअभियंता (अति) : राजेंद्रनगर ब्रिजवाडी येथे जाऊन पाहणी करतो

श्री.राजु शिंदे : आमच्या शहरात कुत्र्यांचा खुप गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. आम्ही जेव्हा-जेव्हा आम्ही गाडीवाल्याला फोन लावतो तेव्हा ते बोलतात कि आम्ही कूत्रे धरले मला असे वाटते कि आपण जे बंदी लागू केली परंतू काही अधिकारी त्या नावाखाली आम्हाला येत

नाही परत तिथेच आणून सोडतात ते कुत्रे धरत नाही फक्त धरायचे नाटक करतात त्या कमिटीचे नंबर नागरिकांना दया आणि नागरिक स्वतः त्यांना फोन लावून त्याबद्दल चौकशी करतील जे लोक आम्हांला सांगतात ना कि हे कुत्रे धरु नका म्हणून त्यांनी स्वतः त्याची व्यवस्था केली पाहिजे जसे आपण बंदिस्त मेंढीपालन , शेळीपालन करतो तसेच कुत्र्यांचे सुद्धा पालन करा त्याचे पालन एकतर समितीने केले पाहिजे किंवा महानगरपालिकेने त्याची व्यवस्था करावी माझ्या वार्डामध्ये ३ जणांना कुत्रे चावले ही नागरिकांचा जिवाशी खेळायची बाब झाली यासंबंधीत अधिकाऱ्यांनी खुलासा करावा की आपल्याला न्यायालयाने काय नियम घालून दिले आहेत पण न्यायालयाने असे नियम लावले आहेत का कि जे बाधीत व पिसाळलेले कुत्रे आहेत ते जिथून धरले आहेत तिथेच सोडावे व ते नागरिकांना चावलेत तरी चालेल आपण स्वतः जाऊन न्यायालयाकडे विचारपूस करावी की कूत्र्याची जी वाढ झालेली आहेत त्यांच्यासाठी गाईडलाईन दयावी.

मा.सभापती : खुलासा करावा.

संचालक(प्रा.सं) : स.सदस्य राजू शिंदे यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे स्टॅडिंग बोर्डने बनवलेल्या कमिटीने जरी आपल्याला नियम घालून दिलेले असतील ते कुत्रे सरसकट मारु नये तरी जे कुत्रे खुप पिसाळलेले किंवा रोगाने त्रस्त झालेले असतील त्यांना आपण नियमानुसार इंजेक्शन देऊन मारु शकतो त्यासाठी सुद्धा शासनाने काही अधिकारी व कमिटी नेमलेली आहे आणि कालच त्या कमिटी व एन.जी.ओ. सोबत मिटींग घेतली आणि माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्यात त्यावर ताबडतोब कारवाई करतो.

श्री.राजू शिंदे : कारवाई नाही ताबडतोब त्यावर अंमलबजावणी झाली पाहिजे तुम्हाला कुत्रे मारायचे नसेल तर त्यांचा कोंडवाडा करण्याची व्यवस्था करा.

संचालक(प्रा.सं) : कुत्र्यांना कोंडवाडा करण्याची योजना हाती घेतलेली आहे आणि सस्पेंड होण्याआधी मी प्रस्तावना देखील केलेली आहे.

श्री.राजू शिंदे : आमची नम्र विनंती आहे कि पहिले वाघावर तुम्ही सस्पेंड झालेले आहात आता कूत्र्यावरती तरी सस्पेंड होऊ नका आणि तुम्ही जी प्रस्तावना केली आहे ती मंजूर होईपर्यंत आपल्याला जे सोयीस्कर असेल आपल्याकडे जी जागा उपलब्ध असेल तिथे त्यांना ठेवण्याची व त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था करा व लागल्यास एन.जी.ओ. ची मदत घ्या व त्यांचे फोन नं. सर्व नगरसेवकाच्या द्यावे.

श्री.राजेंद्र जंजाळ : आपल्याकडे जेवढी वाघांची समस्या आहे तेवढीच कुत्र्यांची समस्या गंभीर झालेली आहे कारण वाघांची संख्या कमी होत चालेली आहे तेवढीच कुत्र्यांची संख्या वाढत चालेली आहे. ही सूध्दा गंभीर बाब आहे यावर सुध्दा लक्ष केंद्रीत केले पाहिजे.

संचालक(प्रा.सं) : आम्ही एक-दीड महिन्यापासून ॲनिमल कंट्रोलचे कार्यक्रम चालू केले आहेत व हा खुप चांगला उपक्रम हाती घेतला आहे. ५० कुत्र्यांची ऑपरेशन झालीच पाहिजे.

श्री.राजेंद्र जंजाळ : मनुष्याची संख्या कमी व्हावी म्हणून आपल्याकडे कायदे आणि नियोजन आहे पण कूत्र्यांची संख्या कमी करण्यासाठी काही नियोजन असेल ना शासनाकडे ते बघावे. कार्यवाही करावी.

संचालक(प्रा.सं) : त्यासाठीच आपण ॲनिमल कंट्रोलचा कार्यक्रम राबवित आहोत.

मा.सभापती : माननीय सदस्यांच्या सर्व सूचनांची अंमलबजावणी करावी.

श्री.राजेंद्र जंजाळ : यामध्ये दोन महत्त्वाचे विषय आहेत कि जे लोक अनधिकृतपणे मांस विक्री करतात ते उर्वरीत मांस रस्त्याचा कडेला आणून टाकतात व ते खाण्यासाठी सर्व कुत्रे जमा होतात व त्यामुळे नागरिकांना त्रास होतो कारगिल गार्डन समोर कचरापट्टी तयार झाली. जालना रोडवर आजूबाजूच्या परिसरातील लोक वेस्टेज आणून टाकतात. त्यामुळे तेथे आजार वाढतात. कारगिल गार्डनच्या परिसरात कमीत कमी ३०० कुत्र्यांची संख्या झाली व ती आपल्या बाहेर झाले आहे.

संचालक(प्रा.सं) : आपल्या शहरात अंदाजे ३५००० कुत्र्यांची संख्या आहे. मध्यतंरी ॲनिमल कंट्रोलचा कार्यक्रम बंद झाल्यामुळे त्यांच्या संख्येत वाढ झाली आहे पण आपण त्यांच्या ऑपरेशनची संख्या वाढवून त्यावर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न करतो आहे.

मा.सभापती : कुत्र्यांचा वाढता त्रास पाहता माननीय सदस्यांनी दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी करावी.

श्री.गजानन बारवाल : मोहम्मद अब्दूल अहमद याकडे आपल्या महानगरपालिकेचे १८,३३,४८८ रुपये बाकी आहे. गेल्या ८ वर्षापासून तो पैसे भरत नाही. त्यांनी वेळोवेळी असे लिहून दिले कि मी पैसे भरत नाही. माझी अशी विनंती आहे कि त्यांच्यावर त्वरीत जप्तीची कारवाई सुरु करावी.

श्री.सचिन खैरे : सध्या जे पॅचवर्क जे काम चालू आहे पावसाळा येण्याआधी जे काम करायला हवे होते त्याला आधीच उशीर झाला आहे. आणि जे पॅचवर्क करताय ते निकृष्ट दर्जाचे झालेले आहे.

मा.सभापती : बारवाल साहेबांनी जो प्रश्न दिलेला आहे त्यावर प्रशासनाने तात्काळ कारवाई करावी.

श्री.सचिन खैरे : काही ठिकाणी खडी टाकण्यात येते काही ठिकाणी सिमेंटचे पॅचवर्क करण्यात आले. काही डांबरचे करण्यात आहे असा सगळा सावळा गोंधळ करुन निकृष्ट दर्जाचे काम चालू आहे. आता सगळया शहरात गणपती बसणार आहे तर पॅचवर्कचे काम व्यवस्थित झाले पाहिजे निकृष्ट दर्जाचे काम चालू आहे. काही ठिकाणी खडीपण निघून आली आहे.

मा.सभापती : पॅचवर्कच्या बाबतीत काझी साहेबांनी खुलासा करावा.

श्रीमती.सायरा बानो : कलेक्टर ऑफिस चौक ते शहागंज रस्त्यावरील खड्डे बजवले जात नाही. लाईट व्यवस्था होत नाही. आता गणपती, मोहरम सण आले. खड्डे बुजवण्याचे काम काही ठिकाणी सुरु केले परंतु उर्वरित ठिकाणचे खड्डे भरले नाही. पॅचवर्क ताबडतोब करावे. काम न करता काम केल्याचे सांगतात हे योग्य नाही.

श्री.नासेर सिद्दिकी : खड्डे खोदकामावर किती खर्च झाला याचा खुलासा आधी करण्यात यावा. यावर किती बजेट ठेवले आहे?

श्रीमती.सरवत बेगम : दमडी महलचे काम चालु आहे तिथे कॉन्ट्रॅक्टरने अतिक्रम करुन ठेवले आहे.

मा.सभापती : काझी साहेबानी खूलासा करावा.

कक्ष प्रमुख (दक्षता) : पॅचवर्क जे काम करण्यासाठी काही निविदा होत्या त्या निविदा पुर्ण न झाल्यामूळे ठेकेदार उपलब्ध झाले नाही. तथापि जी काही यंत्रणा उपलब्ध आहे आपल्याकडे त्याच्या मार्फत आपण खड्डे बुजवून घेण्याचा प्रयत्न करीत आहोत विशेषतः गणपती आणि मोहरम या दोन्ही सणानिमित्त जे मार्ग आहेत त्या मार्गावरील सर्व खड्डे बूजविण्यासाठी व ते ही खड्डे व्यवस्थितरित्या व चांगल्या दर्जाचे बनविण्याचे प्रयत्न करीत आहोत आणि तेही पूढील ८ दिवसात पूर्णतः भरुन घेण्यात येतील जे काही खड्डे झाले. आहेत यांनी सांगितल्याप्रमाणे ते आपण मुरुम द्वारे भरले होते सध्या पावसाळा असल्यामुळे डांबराचे प्लान्ट चालू नाही आहेत तरी आम्ही एका ठेकेदाराला विनंती करून एक डांबराचा प्लान्ट चालू करुन घेतला आहे आणि डांबराचे पॅचवर्क परमनंन्ट कसे करुन घेता येईल त्याचा आपण प्रयत्न करीत आहोत आणि ते आपण करुन घेणार आहोत.

मा.सभापती : गणपतीच्या आधी रस्त्याचे पॅचवर्कचे काम झाले पाहीजे.

श्री.नासेर सिद्दिकी : दमडी महलचे काम का थांबवण्यात आले? मा.आयुक्तांनी सुध्दा सांगितले की, ते काम लवकर सुरु करा पण अद्याप काम सुरु झालेले नाही.

कक्ष प्रमुख (दक्षता) : दमडी महल चे थोडया पोर्शनचे काम झाले आहे आणि बहुतांश उत्त्तरेकडचे काम बाकी खडीमध्ये पूर्णतः पाणी असल्याने डांबरीकरण करता आले नव्हते पण आता ती खडी सुकली आहे आज दुपारपासून ते काम सुरु करण्यात येईल.

श्रीमती.सायरा बानो : व्ही आय पी रोड आहे. खड्डे बुजवण्याचे काम आधी करण्यात यावे.

कक्ष प्रमुख (दक्षता) : कलेक्टर ऑफिस पासून ते शहागंजकडे जाणाऱ्या रस्त्यावर जवळ एक मोठा खड्डा आहे तिथे पूर्ण पाण्याचा फ्लो येत आहे त्यामध्ये त्याला थांबवून ठेवले आहे डांबराचे प्लान्ट चालू होताच ते भरवण्यात येतील उर्वरीत सर्व खड्डे २-४ दिवसात भरण्याचा प्रयत्न करु.

श्री.सचिन खैरे : मकईगेट च्या आतील रस्ता आहे वाहतुकीस बंद करा कारण नागरीक गणपती बघायला येतात.

कक्ष प्रमुख (दक्षता) : जेवढे गणपती विसर्जनाचे मार्ग आहेत ते आम्ही लवकरात लवकर काम करणार आहोत या व्यतिरिक्त शहरातील बऱ्याच रस्त्यावर कामे करणार आहोत.

मा.सभापती : मा.आयुक्तांना सूचित करण्यात येते कि आज जे अधिकारी अनुपस्थित होते त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. आजची सभा तहकूब करण्यांत येते.

या बरोबरच सभा तहकूब केल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**दिलीप सुर्यवंशी**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद